# अर्थसंकल्प 2018-19

**A) प्रशासन (Governance) –**

1) गेल्या 4 वर्षांत शासनाने मूलभूत संरचनात्मक सुधारणा राबविल्या आहेत. यातील प्रमुख सुधारणांमुळे मोठे बदल झाले आहेत. जसे,
2) GST च्या अंमलबजावणीमुळे अप्रत्यक्ष करप्रणाली सरल झाली आहे.
3) विमुद्रीकरणामुळे रोखीचे व्यवहार कमी झाले असून, अर्थव्यवस्था डिजिटल व्हायला गती लाभली आहे.
4) विमुद्रीकरणामुळे करदात्यांची संख्या (tax base) वाढली आहे.
5) नादारी व दिवाळखोरी कायद्यामुळे ऋणको व धनकोंमधील संबंध बदलले (सुधारले) आहेत.
6) पुनर्भांडवलीकरणामुळे बँका सक्षम होताहेत.
7) थेट लाभ हस्तांतरण (DBT) यंत्रणा ही जगातील सर्वांत मोठी व यशस्वी यंत्रणा ठरली आहे.

**B) अर्थव्यवस्था व विकास (Economy and Development) –**

1) भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वांत वेगवान (fastest growing) अर्थव्यवस्था ठरली आहे. IMF ने भारतीय अर्थव्यवस्था पुढील वर्षात 7.4% ने वाढण्याचे भाकीत केले आहे.
2) 2014-15 ते 2017-18 या 3 वर्षांत सरासरी GDP वृद्धीदर 7.5% होता.
3) गेल्या 3 वर्षांत जागतिक बँकेच्या Ease of Doing Business निर्देशांकात भारत 42 अंकांनी वर गेला असून पहिल्या शंभरात आला आहे.
4) भारतात होणारी परकीय थेट गुंतवणूक वाढली आहे.
5) देशातील आम मनुष्यासाठी, विशेषतः गरीब व मध्यमवर्गीय गटासाठी Ease of Leaving मध्ये म्हणजे त्यांच्या राहणीमानात सुलभता आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

**C) पैसा आणि चलन (Money & Currency) –**

1) भारत सरकार बिटकॉईनसारख्या Cryptocurrency ला वैध चलन किंवा वैध नाणे मानत नाही. त्यामुळे अशा पैशाचा वापर दूर करण्याकरिता शासन योग्य उपाययोजना करेल.
2) उलट Block Chain Technology या तंत्रज्ञानाचा वापर डिजिटल अर्थव्यवस्थेत कसा करता येईल, त्याचा शोध घेतला जाईल.

**D) भारतीय वित्तीय बाजार (Indian Financial Market) –**

1) मुद्रा योजना – मुद्रा योजनेमुळे सूक्ष्म उद्योगांना दिली जाणारी कर्जे 10.38 कोटी रुपयांवरून 4.6 लाख कोटी रुपयांच्या घरात गेली आहेत. 76% कर्ज खाती महिलांची असून, 50% खाती अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गांची आहेत. 2018-19 मध्ये 3 लाख कोटी रुपयांच्या कर्जवाटपाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
2) राष्ट्रीय गृह बँक (NHB) – राष्ट्रीय गृह बँकेची मालकी रिझर्व्ह बँकेकडे आहे. ही मालकी भारत सरकारकडे वर्ग करण्यासाठी राष्ट्रीय गृह बँक कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आहे.
3) साधारण विमा कंपन्या – GIC Re अंतर्गत ज्या 4 साधारण विमा कंपन्या कार्यरत आहेत त्यापैकी 3 कंपन्यांचे (National Insurance Company Ltd., United India Assurance Company Ltd. आणि Oriental India Insurance Company Ltd.) विलीनीकरण करून त्यातून एकच कंपनी निर्माण करण्यात येणार.
4) प्रादेशिक ग्रामीण बँका (RRB) – प्रादेशिक ग्रामीण बँकांनी ग्रामीण पतपुरवठा वाढवावा या उद्देशाने त्यांच्या भांडवलवर्धनाची गरज आहे. यासाठी मोठ्या प्रादेशिक ग्रामीण बँकांना बाजारातून भांडवल उभारण्याची परवानगी दिली जाईल.
5) पुनर्भांडवलीकरण (Recapitalization) – बँकांच्या पुनर्भांडवलीकरणासाठी EASE (Enhanced Access and Service Excellence) कार्यक्रम आखण्यात आला आहे. यामुळे बँकांच्या पतपुरवठ्याच्या क्षमतेत 5 लाख कोटी रुपयांची वाढ होणार आहे.

**E) सार्वजनिक वित्त – राजकोषीय व्यवस्थापन (Fiscal Management) –**

1) 2013-14 मध्ये राजकोषीय तूट 4.4% होती. राजकोषीय दृढीकरणाच्या प्रयत्नांमुळे ही तूट 2014-15 मध्ये 4.1%, 2015-16 मध्ये 3.9%, 2016-17 मध्ये 3.5% आणि 2017-18 मध्ये 3.5% वर आली आहे. 2018-19 मध्ये राजकोषीय तूट 3.3% राहण्याचा अंदाज आहे.
2) नवीन FRBM समितीच्या शिफारशी स्वीकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यान्वये,

i) राजकोषीय तूट हे मुख्य निर्देशक समजण्यात आले आहे.

ii) कर्जाचे GDP शी असलेले प्रमाण कमी करत 40% पर्यंत आणण्याचे ठरविण्यात आले आहे.

3) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व गव्हर्नरांचा पगार अनुक्रमे 5 लाख रु., 4 लाख रु. व 3.5 लाख रु. करण्यात येईल.

4) खासदारांच्या पगारात वाढ 1 एप्रिल 2018 पासून लागू होईल. तसेच चलनवाढ आधारीत पंचवार्षिक आढावा घेता येईल, अशी पगारवाढीची कायमची पद्धत विकसित केली जाईल.

**F) करप्रस्ताव (Tax Proposals) –**

1) 2015–16 ते 2016–17 प्रत्यक्ष करमहसुलात 12.6% ची वाढ झाली. 2016–17 ते 2017–18 (जानेवारीपर्यंत) प्रत्यक्ष करमहसुलात 18.7% वाढ झालेली होती.

2) 2015–16 मध्ये नवीन करदात्यांची संख्या 66.26 लाख होती. 2016–17 मध्ये नवीन करदात्यांची संख्या 85.51 लाख होती. करदात्यांची संख्या 2014–15 च्या सुरवातीला 6.47 कोटी होती, ती 2016–17 च्या अखेरीस 8.27 कोटी झाली.

3) प्रत्यक्ष कर –

**a) आयकर –**

i) एकूण आयकर भरण्यावर 3% दराने शिक्षण उपकर आकारला जात असे. याऐवजी 4% दराने 'आरोग्य व शिक्षण उपकर' आकारला जाणार.

ii) दीर्घकालीन भांडवली लाभावर कर आकारला जात नसे. 1 फेब्रुवारी 2018 पासून दीर्घकालीन भांडवली लाभावर 10% दराने दीर्घकालीन भांडवली लाभ कर आकारला जाणार. 1 लाख रुपयांपेक्षा जास्तीच्या भांडवली लाभावरच कर आकारला जाणार.

iii) आरोग्य विम्यापोटी ज्येष्ठ नागरिकांनी दिलेल्या कमाल 30,000 रुपयांचा हप्ता आयकरमुक्त असे, तो कमाल 50,000 रु. करण्यात येणार.

iv) ज्येष्ठ नागरिकांनी गंभीर आजारावर उपचारापोटी खर्च केलेले कमाल 60,000 रुपयांचे उत्पन्न आयकरमुक्त असे. ते कमाल 1 लाख रु. करण्यात येणार.

v) अतिज्येष्ठ नागरिकांनी गंभीर आजारावर उपचारापोटी खर्च केलेले कमाल 80,000 रुपयांचे उत्पन्न आयकरमुक्त असे, ते कमाल 1 लाख रु. करण्यात येणार.

vi) पगारदार व्यक्तींनी वाहतुकीवर खर्च केलेले कमाल 19,200 रु. व आरोग्य उपचारापोटी खर्च केलेले कमाल 15,000 रु. उत्पन्न असे एकूण 34,200 रु. उत्पन्न आयकरमुक्त असे, ते कमाल 40,000 रु. करण्यात येणार.

vii) मुदत ठेवींमधून कमावलेले कमाल 10,000 रु. उत्पन्न आयकरमुक्त आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी ही मर्यादा कमाल 50,000 रु. करण्यात येणार.

viii) IFSC (International Financial Services Centre) मध्ये होणाऱ्या निर्देशित प्रतिभूती व डेरिव्हेटिव्हच्या व्यवहारांवर अनिवासींना भांडवली लाभ करात सवलत देण्यात येणार.

ix) कर विवरणपत्राची e-assessment पद्धत 2016 मध्ये प्रायोगिक स्तरावर राबविण्यात आली. 2017 मध्ये ती 102 शहरांमध्ये राबविण्यात आली. आता ती देशभर लागू केली जाणार.

**b) निगमकर –**

i) प्राथमिक कृषी प्रक्रिया हाताळणाऱ्या सदस्यांना मदत देणाऱ्या सहकारी संस्थांना (Cooperative Societies) नफ्यामध्ये 100% करसवलत मिळते. या तत्त्वावर आता ही सवलत 'कृषी उत्पादन कंपन्यांना (Farmer Producer Companies)' दिली जाणार. ज्या कृषी उत्पादन कंपन्यांची वार्षिक उलाढाल 100 कोटी रुपयांपेक्षा कमी आहे, त्या कंपन्यांना पुढील 5 वर्षे निगमकरात 100% सवलत दिली जाणार. यामुळे 'ऑपरेशन ग्रीन योजना' आणि 'संपदा योजना' यांना गती मिळेल.

ii) (ज्या कंपन्यांची 2015–16 मध्ये 50 कोटी रुपयांपेक्षा कमी उलाढाल होती त्यांच्यासाठी 2017–18 मध्ये निगमकराचा दर 30% ऐवजी 25% होता. या तरतुदीचा सुमारे 96% कंपन्यांना लाभ झाला.) 2018–19 अर्थसंकल्पात ज्या कंपन्यांची 2016–17 मध्ये 250 कोटी रुपयांपेक्षा कमी उलाढाल होती त्यांच्यासाठी 25% निगमकराचा दर राहणार आहे. यामुळे 99% कंपन्या 25% दरात बसतील तर 1% कंपन्या (जवळपास 7,000 कंपन्या) 30% दरात बसतील. 99% कंपन्या करकपातीमुळे गुंतवणूक करतील आणि त्यातून रोजगारनिर्मिती होईल. सरकारला मात्र 2018–19 मधील या तरतुदीमुळे 7,000 कोटी रुपयांचे महसुली नुकसान होणार आहे.

iii) सर्व निगम करदात्यांना 3% शिक्षण उपकर भरावा लागत असे. याऐवजी 4% दराने आरोग्य व शिक्षण उपकर आकारला जाणार. आयकर व निगमकरावरील वाढीव उपकरामुळे 11,000 कोटी रुपयांचा जास्तीचा महसूल गोळा होणार.

iv) 2.5 लाख रुपये किंवा त्यापेक्षा जास्त किमतीचा व्यवहार करणाऱ्या कंपनीस PAN क्रमांक मिळविणे अनिवार्य राहील.

v) विविध ट्रस्ट व संस्था 10,000 रुपयांपेक्षा जास्तीचा व्यवहार रोखीने करत असतील तर त्यावर कर भरावा लागणार.

4) अप्रत्यक्ष कर –

**a) सीमा शुल्क –**

i) वस्तूंच्या आयातीवरील आयातशुल्कावर 3% दराने शिक्षण उपकर आकारला जात असे. याऐवजी 10% दराने सामाजिक कल्याण अधिभार (Social Welfare Surcharge) आकारला जाणार. पेट्रोल, डिझेल, सोने आणि चांदीच्या आयात शुल्कावरील सामाजिक कल्याण अधिभाराचा दर 3% असेल.

ii) व्यवसाय सुलभता आणि WTO चा व्यापार सरलीकरण करार (Trade Facilitation Agreement) यांना पूरक अशा दुरुस्त्या 1962 च्या सीमाकर कायद्यात करण्यात येणार.

iii) गेल्या 2 दशकांमध्ये आयात शुल्कात सतत कपात होत गेली. मात्र देशी उत्पादनाच्या मूल्यवर्धनासाठी व मेक इन इंडियाला चालना देण्यासाठी काही वस्तूंच्या आयातीवरील आयात शुल्कात वाढ करण्यात येईल, जसे अन्नप्रकिया क्षेत्र, इलेक्ट्रॉनिक, वाहनांचे सुटे भाग, बूट–चपला, फर्निचर इत्यादी. उदाहरणार्थ – मोबाईल फोनवरील आयात शुल्क 15% वरून 20% केले जाणार.

iv) काजू प्रक्रिया उद्योगाला मदत व चालना म्हणून कच्च्या काजूंच्या आयातीवरील आयात शुल्क 5% वरून कमी करून 2.5% केले जाणार.

**b) GST –**

GST अंमलबजावणीमुळे CBEC (Central Board of Excise & Customs) चे नाव CBIC (Central Board of Indirect Taxes & Customs) असे केले जाणार.

**G) कृषी (Agriculture) –**

1) सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहे.

2) 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

3) कृषी व्यवसाय हा उपक्रम (enterprise) समजून या उपक्रमातून कमी खर्चातून चांगला मोबदला मिळाला पाहिजे. कृषी उपक्रमातून उत्पादक रोजगारनिर्मिती करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

4) 2016–17 मध्ये 275 मिलियन टन अन्नधान्य व 300 मिलियन टन फळे व भाजीपाला इतके विक्रमी उत्पादन झाले.

5) उत्पादन खर्चाच्या 1½ पट किमान आधारभूत किंमत जाहीर करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमती जाहीर करताना हे तत्त्व वापरले गेले. आता उर्वरित पिकांच्या किमान आधारभूत किमती जाहीर करताना हे तत्त्व वापरले जाईल.

6) किमान आधारभूत किमतीचा शेतकऱ्यांना पूर्णपणे लाभ मिळण्यासाठी नीती आयोग केंद्र व राज्य सरकारांबरोबर चर्चा करून यथायोग्य यंत्रणा सुचवेल.

7) शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी विविध प्रयत्न केले जातील. जसे–संस्थात्मक यंत्रणा विकसित करणे, किमती व मागणीच्या अनुमानाचा वापर करणाऱ्या धोरणांचा विकास करणे, Futures व Options चा वापर करणे, Warehouse Depository System चा विस्तार करणे, आयात व निर्यातीबाबत योग्य निर्णय घेणे इत्यादी.

8) 585 APMC मंडीच्या विलीनीकरणातून राष्ट्रीय कृषी बाजार (eNAM) विकसित केला जातोय. अर्थसंकल्प सादर होईतोवर 470 मंडी जोडल्या गेल्या आहेत. सर्व 585 मंडी मार्च 2018 अखेरपर्यंत जोडल्या जातील.

9) 85% शेतकरी लघू व सीमांत आहेत. ते सर्वच थेट APMC मंडीपर्यंत पोहोचू शकत नाहीत. हे ध्यानात घेऊन eNAM प्रमाणे 22,000 ग्रामीण बाजारांचे विकास व सक्षमीकरण करून त्यांना GrAMs (Grameen Agriculture Markets) म्हटले जाईल आणि हे GrAM इलेक्ट्रॉनिक जोडणीने eNAM शी जोडले जाईल. या GrAM च्या विकासासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा मगांनरेगा व विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून पुरविल्या जातील. APMC कायद्यांच्या कक्षेबाहेर असणारे GrAM शेतकऱ्यांना ग्राहकांपर्यंत थेट माल विकण्यास व्यासपीठ पुरवेल.

10) 585 APMC किंवा eNAM व 22,000 GrAM च्या विकास व सक्षमीकरणासाठी 2,000 कोटी रुपयांचा कृषी बाजार पायाभूत निधी (AMIF - Agri-Market Infrastructure Fund) उभारला जाईल.

11) विविध औद्योगिक विकास प्रतिमानांमध्ये 'समूह–cluster' प्रतिमान वापरले जाते, तसे प्रतिमान कृषी क्षेत्रात विकसित केले जातील. cluster प्रतिमान विकसित करण्यासाठी 'जिल्हा' हे एकक ठरविता येऊ शकते. विशिष्ट जिल्हा विशिष्ट कृषी उत्पादनासाठी विकसित करता येऊ शकतो. उदा.– फलोत्पादन समूह, जैविक खतआधारीत उत्पादन समूह.

12) विविध औषधी वनस्पती व सुगंधी वनस्पती लागवड व त्या आधारीत उद्योग जसे परफ्यूम उद्योग इत्यादींना सहाय्य करण्यासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केली जाणार.

13) अन्नप्रक्रिया क्षेत्राचा सरासरी वृद्धीदर 8% आहे. या क्षेत्रात गुंतवणूक वाढण्याच्या उद्देशाने सरकारने प्रधानमंत्री किसान/कृषी संपदा योजना सुरू केली आहे. अन्नप्रक्रिया मंत्रालयासाठीची तरतूद 2017–18 मधील 715 कोटी रुपयांवरून 2018–19 मध्ये 1,400 कोटी रु. करण्यात येणार.

14) टमाटा, कांदा व बटाटा हे वर्षभर वापरले जातात. परंतु त्यांचे उत्पादन विशिष्ट हंगामातच व विशिष्ट क्षेत्रातच होते. तसेच नाशवंत असल्यामुळे त्यांच्या किमतीत बरेच चढउतार येतात आणि उत्पादक व ग्राहकांना त्याचा फटका बसतो. हे ध्यानात घेऊन ऑपरेशन फ्लडप्रमाणे 'ऑपरेशन ग्रीन' सुरू केले जाईल. यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केली जाईल. ऑपरेशन ग्रीनच्या माध्यमातून कृषी उत्पादक संस्था, वाहतूक यंत्रणा, प्रक्रिया यंत्रणा, व्यावसायिक व्यवस्थापन इत्यादींना प्रोत्साहन दिले जाईल.

15) भारतीय कृषी निर्यातीची क्षमता 100 बिलियन डॉलर आहे, परंतु सध्या 30 बिलियन डॉलरचीच कृषी निर्यात होते. 100 बिलियन डॉलरची क्षमता प्राप्त करण्यासाठी कृषी निर्यातीचे उदारीकरण केले जाईल. सर्व 40 मेगा फूड पार्कमध्ये आधुनिक चाचणी केंद्रे उभारली जातील.

16) किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ मासेमारी व पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दिला जाईल. याचा लहान व सीमांत शेतकऱ्यांना अधिक फायदा होईल.

17) बांबू म्हणजे 'हरित सोने (Green Gold)'. 1,290 कोटी रु. खर्चून पुनर्रचित राष्ट्रीय बांबू अभियान (Restructured National Bamboo Mission) सुरू करण्यात येईल.

18) शेतकरी जमिनीचा वार सौरऊर्जा तयार करण्यासाठीही करू शकतात. यासाठी योग्य यंत्रणा तयार करण्यासाठी केंद्र राज्यांना प्रोत्साहन देईल. तसेच तयार झालेली अतिरिक्त वीज खरेदी करण्याचेही आश्वासन देईल.

19) 10,000 कोटी रु. गुंतवून दोन प्रकारचे निधी उभारले जातील. FAIDF (Fisheries & Aquaculture Infrastructure Development Fund) आणि AHIDF (Animal Husbandry Infrastructure Development Fund).

20) कृषी क्षेत्रासाठी दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या आकारमानाची तरतूद 2014-15 मध्ये 8.5 लाख कोटी रु. होती, ती वाढत जाऊन 2017-18 मध्ये 10 लाख कोटी रु. झाली. आता 2018-19 मध्ये ही तरतूद 11 लाख कोटी रुपयांची असेल.

21) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत 96 सिंचन वंचित जिल्ह्यांमध्ये भूजल सिंचनाच्या योजना राबविल्या जातील.

22) FCI च्या भांडवलाची पुनर्रचना करण्यात येईल. FCI ला दीर्घमुदतीच्या कर्जरोख्यांमधून भांडवल उभारणीची परवानगी दिली जाईल.

### H) उद्योग (Industry) –

1) 14 केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम (CPSE) (2 विमा कंपन्यांसह) हे शेअर बाजारात सूचीकृत केले जातील.

2) ONGC ने HPC चे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली आहे.

3) संरक्षण उत्पादनाला चालना देण्यासाठी संरक्षण उत्पादन धोरण 2018 (Defence Production Policy 2018) जाहीर केले जाईल. यामुळे खासगी, सरकारी उद्योग व लघुउद्योगांना चालना मिळून देशी संरक्षण उत्पादनात वाढ होईल.

4) ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला आधार ओळख मिळाली आहे, त्याप्रमाणे देशातील सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांची ओळख (Unique ID) निर्माण केली जाईल.

### I) पायाभूत सुविधा (Infrastructure) –

1) पायाभूत सुविधांवर 2017-18 मध्ये 4.94 लाख कोटी रु. खर्च करण्यात आले होते. 2018-19 मध्ये पायाभूत सुविधांसाठी 5.97 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

2) विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या मंजुरी, व्यवस्थापन व पर्यवेक्षणाच्या दृष्टीने उभारण्यात आलेल्या प्रगती (PRAGATI - Pro-Active Governance And Timely Implementation) यंत्रणेमुळे 9.46 लाख कोटी रुपयांची प्रकरणे शीघ्र हाताळली गेली आहेत.

3) विविध पायाभूत सुविधा –

**a) रस्ते –**

i) देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या खिंडीचे काम सुरू आहे. रोहतांग बोगदा जो लडाख प्रदेशाला जोडतो, तो बारमाही रस्त्यांनी सज्ज करण्यात आला आहे. झोझीला खिंडीत बोगद्याचे काम सुरू झाले आहे. यावर्षी सेला खिंडीत बोगद्याचे काम सुरू केले जाईल.

ii) 2017-18 मध्ये 9,000 कि.मी. लांबीचे राष्ट्रीय महामार्ग उभारले जाताहेत.

iii) भारतमाला परियोजनेला मंजुरी मिळाली असून पहिला टप्पा (Phase-I) मंजूर झाला आहे. पहिल्या टप्प्यात 35,000 कि.मी. रस्ते उभारले जाणार आहेत. यासाठी 5.35 लाख कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. भारतमाला परियोजनेतले हे रस्ते मागास प्रदेशांशी व सीमा प्रदेशांशी जोडणी वाढवतील.

iv) NHAI विविध कामांच्या PPP तत्त्वांमध्ये TOT (Toll, Operate and Transfer) तत्त्वाची भर घालेल. नवीन Infrastructure Investment Funds विकसित केले जातील.

**b) रेल्वे –**

i) बडोदरा येथे रेल्वे विद्यापीठ उभारले जातेय.

ii) ज्या पद्धतीने भारतात औद्योगिक कॉरिडोर निर्माण केले जात आहेत, त्याच पद्धतीने '2 संरक्षण उद्योग उत्पादन कॉरिडोर' विकसित केले जातील.

iii) 3,600 कि.मी. रुळाची सुधारणा केली जाईल.

iv) नवीन तंत्रज्ञान वापरले जाताहेत, जसे – Fog safe, Train Protection and Warning System.

v) पुढील 2 वर्षांत 4,267 खुले रेल्वे क्रॉसिंग दूर करण्यात येतील.

vi) 600 मोठे रेल्वे स्टेशनच्या पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे.

vii) 25,000 पेक्षा जास्त रहदारी असणाऱ्या ठिकाणी escalators उभारण्यात येतील.

viii) सर्व स्टेशनवर टप्प्या–टप्प्याने Wi-Fi, CCTV पुरविण्यात येतील.

ix) पेरांबुरमधील Integrated Coach Factory मध्ये अत्याधुनिक रेल्वे बनतेय. अशी पहिली रेल्वे 2018–19 मध्ये सेवेत येईल.

x) मुंबईतील 90 कि.मी. रेल्वेमार्गाचे दुहेरीकरणासाठी 11,000 कोटी रु. व 150 कि.मी. जास्तीच्या लोकल मार्ग विस्तारासाठी 40,000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

xi) बेंगळुरूतील 160 कि.मी. लोकल मार्गासाठी 17,000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**c) विमान –**

i) प्रादेशिक 56 विमानतळे व 31 हेलिपॅड जी वापरली जात नव्हती, ती वापरात आणण्यासाठी UDAN (Ude Desh Ka Aam Nagrik) योजना सुरू करण्यात आली आहे. वरीलपैकी 16 विमानतळे कार्यरत देखील झाली आहेत.

ii) AAI अंतर्गत 124 विमानतळे आहेत. या विमानतळांची क्षमता 5 पटींनी वाढविण्यासाठी 'नभ निर्माण' योजना सुरू करण्यात येईल.

**d) दूरसंचार –**

i) भारतनेट प्रकल्पाच्या Phase - I अंतर्गत 1 लाख ग्रामपंचायती high speed optical fiber network ने जोडण्याचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे 2.5 लाख गावांमधील 20 कोटी लोक ब्रॉडबॅंडने जोडले गेले आहेत.

ii) ग्रामीण क्षेत्रात 5 लाख wi-fi hotspot बसवण्यात येतील.

iii) दूरसंचारासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांसाठी 10,000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

iv) 5G तंत्रज्ञानाची चाचणी IIT - चेन्नई येथे केली जात आहे. या संशोधनाला सहाय्य केले जाईल.

**J) परकीय व्यापार (Foreign Trade) –**

1) CAD कमी होण्यासाठी सुवर्ण मौद्रीकरण कार्यक्रम सुरू आहे. यातील सुवर्ण मौद्रीकरण योजनेची पुनर्रचना केली जाईल. ग्राहककेंद्रित व व्यापारसुलभ असे सुवर्ण एक्स्चेंज (Gold Exchange) उभारले जातील. सुवर्ण संपत्तीची संकल्पना विकसित करण्यासाठी सुवर्ण धोरण (Gold Policy) जाहीर केले जाईल.

2) भारतातून इतर देशांमध्ये होणाऱ्या थेट गुंतवणुकीस ODI (Outward Direct Investment) म्हणतात. या ODI मध्ये या वर्षात 25 बिलियन डॉलरची वाढ झाली आहे. ODI बाबतीत एक सकल व एकात्मिक धोरण जाहीर केले जाईल.

**K) खासगीकरण (Privatisation) –**

1) निर्गुंतवणुकीचे लक्ष्य 2017–18 साठी 72,500 कोटी रु. ठरविण्यात आले होते. ते 2018–19 साठी 80,000 कोटी रु. ठरविण्यात आले आहे.

2) 24 केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमधून (CPSE) निर्गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यात Air India च्या खासगीकरणाचाही समावेश आहे.

**L) दारिद्र्य निर्मूलन (Poverty Alleviation) –**

1) शेतकरी व भूमिहीन कुटुंबांसाठी कृषी व गैरकृषी क्षेत्रात रोजगार निर्माण केला जाईल.

2) 321 कोटी मनुष्यदिन रोजगार निर्माण केला जाईल.

3) मगांनरेगा – 55,000 कोटी रुपयांची तरतूद.

4) मगांनरेगा अंतर्गत 8,552 अंगणवाड्या, 2.6 लाख कि.मी. ग्रामीण रस्ते, 1.83 लाख कंपोस्ट प्रकल्प, 675 अन्नगुदाम, 8,340 ग्रामपंचायती उभारल्या जातील.

5) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती योजनेंतर्गत 49,000 उपक्रम उभारणी व 2.94 लाख रोजगारनिर्मिती केली जाणार.

6) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती योजनेंतर्गत महिला स्वयंसहाय्यता गटांना 2016–17 मध्ये 42,500 कोटी रुपयांची कर्जे दिली गेली. 2015–16 पेक्षा यात 37% ची वाढ झाली. मार्च 2019 पर्यंत हा आकडा 75,000 कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल.

**M) शिक्षण (Education) –**

1) शिक्षक गुणवत्ता वाढविण्यासाठी एकात्मिक B.Ed. कार्यक्रम (Integrated B.Ed. Program) सुरू करण्यात येईल.
2) शालेय पायाभूत सुविधा उभारणीस प्रोत्साहन देण्यासाठी RISE (Revitalizing Infrastructure in School Education) नावाने एक निधी निर्माण केला जाईल. पुढील चार वर्षांत 1 लाख कोटी रुपयांचा RISE निधी उभारला जाईल.
3) तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासाठी फळ्यांचे रूपांतर डिजिटल फळ्यांमध्ये केले जाईल.
4) B. Tech. शिक्षण घेणाऱ्या दरवर्षी 100 विद्यार्थ्यांना IIT व IISC बंगलोरमध्ये Ph.D.करण्यासाठी PMRF (Prime Minister Research Fellows) कार्यक्रम सुरू करण्यात येईल.
5) 2022 पर्यंत 50% पेक्षा जास्त किंवा 20,000 पेक्षा जास्त अनुसूचित जमातींचे प्रमाण/लोकसंख्या असलेल्या प्रत्येक तालुक्यात ‘एकलव्य आदर्श रहिवासी शाळा’ (Eklavya Model Residential School) उपलब्ध असेल, यासाठी प्रयत्न केले जातील.
6) शालेयपूर्व शिक्षण ते बारावी इयत्तेपर्यंतच्या शिक्षणाचा विकास गटागटाने न करता पवित्रवादी (holistic) पद्धतीने केला जाईल.

**N) आरोग्य (Health) –**

1) आयुष्मान भारत – New India 2022 नावाने नवीन योजना सुरू केली जाणार. या योजनेचा उद्देश प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक स्तरावरील आरोग्य यंत्रणेतील आदरातिथ्याचा (health hospitality) विकास करणे आहे.
2) आयुष्मान भारत – New India 2022 अंतर्गत दुहेरी प्रयत्न केले जाणार आहेत.
i) 1.5 लाख आरोग्य व तंदुरुस्ती केंद्रांचा विकास –2017–18 अर्थसंकल्प व राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 अन्वये देशातील 1.5 लाख आरोग्य उपकेंद्रांचे रूपांतर आरोग्य तंदुरुस्ती केंद्रांमध्ये (Health Wellness Centres) केले जात आहे. 2018–19 अर्थसंकल्पात यासाठी सुमारे 1,200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे रूपांतरण 2022 पर्यंत पूर्ण होईल.
ii) राष्ट्रीय आरोग्य संरक्षण अभियान (NHPM - National Health Protection Mission)– 2018–19 अर्थसंकल्पात 2,000 कोटी रुपयांची तरतूद असलेली ही योजना देशातील सर्वांत मोठी आरोग्य योजना ठरणार आहे.
3) क्षयरुग्णांना पोषणाची आवश्यकता असते. या पोषणासाठी क्षयरुग्णांना दरमहा 500 रुपये आर्थिक मदत उपचार चालू असताना दिली जाईल. यासाठी अर्थसंकल्पात 600 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
4) 24 नवीन शासकीय महाविद्यालये उभारली जातील. प्रत्येक राज्यात किमान एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सलग 3 लोकसभा मतदारसंघांमध्ये किमान एक वैद्यकीय महाविद्यालय असेल, असे प्रयत्न केले जातील.

**O) स्वच्छता (Sanitation) –**

1) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत 6 कोटी शौचालये बांधण्यात आली आहेत.
2) 2018–19 मध्ये 2 कोटी (प्रत्यक्षात आकडा 1.88 कोटी) शौचालये बांधली जातील.

**P) निवारा (Housing) –**

1) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत 2017–18 मध्ये 51 लाख घरे बांधण्याचे व 2018–19 मध्ये पुन्हा 51 लाख घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. म्हणजे मार्च 2019 पर्यंत 1 कोटी (प्रत्यक्षात आकडा 1.02 कोटी) घरे बांधली जातील.
2) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत 2018–19 मध्ये 37 लाख घरांसाठी आर्थिक तरतूद करण्यात येईल. परवडण्याजोगे घर या घटकासाठी राष्ट्रीय गृह बँक अंतर्गत AHF (Affordable Housing Fund) उभारला जाईल.

**Q) मूलभूत सुविधा (Basic Amenities) –**

1) प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत 2019 पर्यंत 5 कोटी नवीन LPG कनेक्शन देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. आता हे लक्ष्य ‘8 कोटी नवीन LPG कनेक्शन’ असे ठरविण्यात आले आहे.
2) सौभाग्य योजनेंतर्गत 4 कोटी कुटुंबांपर्यंत मोफत वीज कनेक्शन पुरविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी 16,000 कोटी रु. खर्च होत आहेत.
3) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेने (I व II) सर्व गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे लक्ष्य मार्च 2019 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले आहे. 2018–19 मध्ये यासाठी 57,000 कि.मी. रस्ते उभारणीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. एप्रिल 2019 नंतर या योजनेचा तिसरा टप्पा (PMGSY - III) सुरू होईल. तिसऱ्या टप्प्यात गावातील रस्ते उभारण्यावर भर राहील. गावातील रस्ते, घरे, माध्यमिक शाळा, ग्रामीण दवाखाने आणि GrAM एकमेकांना जोडतील.

**R) शहर विकास (Urban Development) –**

1) अमृत योजनेंतर्गत 500 शहरांसाठी 77,640 कोटी रुपयांच्या राज्य आराखड्यांना मंजुरी देण्यात आली आहे. 500 शहरांमध्ये

पाणीपुरवठ्याच्या 494 प्रकल्पांना 19,428 कोटी रुपये व सांडपाणी सुविधेच्या 272 प्रकल्पांना 12,429 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

2) स्मार्ट सिटी मिशन योजनेंतर्गत 100 पैकी 99 शहरे निवडण्यात आली असून, त्यासाठी 2.04 लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे आराखडे बनविण्यात आले आहेत. या शहरांमध्ये स्मार्ट कमांड व कंट्रोल सेंटर, स्मार्ट पार्क, स्मार्ट रोड, सोलर रूफटॉप, इंटेलिजंट ट्रान्स्पोर्ट सिस्टीम उभारली जात आहे.

**S) सामाजिक सुरक्षा (Social Security) –**

प्रधानमंत्री वय वंदना योजना मार्च 2020 पर्यंत राबविली जाणार. या योजनेत एकरकमी ठेवीची (Purchase price) कमाल मर्यादा 7.5 लाख रु. आहे, ती 15 लाख रु. करण्यात येणार.

**T) इतर –**

महात्मा गांधीजींची 150 वी जयंती 2 ऑक्टोबर 2019 ला साजरी होईल. भारत सरकार व जनसहभागाने गांधीजींनी शिकविलेल्या तत्त्वांना अनुसरून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. यासाठी 2018–19 मध्ये 150 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच एक राष्ट्रस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान असून या समितीत राज्यांचे मुख्यमंत्री, राजकारणातील विविध व्यक्ती, गांधीवादी, विचारवंत, तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यात आली आहे.

दीपस्तंभ®
प्रकाशन
0257–2223218

